
# रसेल हा एक विशेष मुलगा आहे.



आॅटिझम या विषयावरचं एक पुस्तक - मुलांसाठी

# रसेल हा एक विशेष मुलगा आहे.



हे पुस्तक पालकांसाठीसुध्दा आहे,
ज्यामुळे आपल्या मुलांना ते सहाय्य करु शकतील.

लेखक : चार्ल्स अमेंटा
मराठी अनुवाद : नीलांबरी

# पालकांसाठी पुस्तकाचा थोडक्यात परिचय

हे पुस्तक सर्वात महत्वाच्या व्यक्तींसाठी म्हणजे लहान मुलांसाठी, त्यांना ऑटिझमची माहिती व्हावी यासाठी लिहिलं आहे. एका ऑटिस्टिक मुलाचा बाप आणि डॉक्टर असल्यामुळे ऑटिझम म्हणजे नक्की काय याचं यथार्थ चित्र मला या पुस्तकात रंगवता आलं असं मला वाटतं. पालक, शिक्षक आणि इतर जणांना हे विषय उपयुक्त ठरेल अशी मला आशा आहे.

केवळ वर्तमानपत्रं आणि मासिकंच नव्हे, तर टेलिव्हिजन आणि चित्रपटांमध्येही ऑटिझम सातत्यानं दाखवला जातो. हे स्वागतार्ह आहे आणि दाखवणार्‍यांचा हेतूही उचित आहे. पण या माध्यमांमध्ये दाखवल्या जाणार्‍या दोन गोष्टी चिंतेच्या आहेत. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे या माध्यमांमध्ये पालक विकाराचं मूळ कारण न शोधता किंवा योग्य ते उपचार न करता काहीतरी चमत्कारानं तो विकार बरा करतात असं दाखवलं जातं.

हा विकार पूर्णपणे बरे करणारे उपचार उपलब्ध नाहीत. इतर कोणत्या तरी विकाराचं ऑटिझम हे चुकीचं निदान झालं असेल तर बरे करणारे उपचार उपयोगी पडू शकतात. ज्या मुलांना नीट बोलता येत नाही किंवा ते वेगळं वागतात त्या सर्वांना ऑटिझम नसतो. दुसरी नेहमी आढळणारी चिंतेची गोष्ट म्हणजे, ऑटिस्टिक लोकांकडे काही विशिष्ट सृजनशीलता असते. उदाहरणार्थ, विलक्षण स्मरणशक्ती किंवा गणितं सोडवण्याची किंवा संगीतातली प्रतिभा. अशा प्रकारची सृजनशीलता ऑटिस्टिक मुलांमध्ये असण्याचं प्रमाण अत्यल्प आहे.

ऑटिझम हा एक गंभीर मनोविकार आहे. जिथे मुलांची मानसिक वाढ खुंटते. आत्ताच्या निष्कर्षांनुसार १०००० मुलांपैकी १५ मुलांना ऑटिझम असतो. लहानपणी निदान झालेला ऑटिझम मुलांच्या तीन पैलूंवर आघात करतो – समाजातलं मिसळणं, भाषेचा विकार आणि खेळण्याबागडण्याच्या कृती. ऑटिझम का होतो याची अनेक कारणं अजून अज्ञात आहेत. अनेकदा गर्भावस्थेतच मुलांना संसर्ग किंवा इतर समस्या असतात असं साधारणपणे दिसून येतं. क्रोमोसोममधली विकृतीदेखील ऑटिझमचं कारण ठरु शकते. ऑटिझमची लक्षणं साधारणपणे दुसर्‍या वर्षी दिसायला लागतात. पण याआधीच्या वयातही ऑटिस्टिक मुलांमध्ये काही लक्षणं दिसतात. उदाहरणार्थ, समोरच्या व्यक्तीच्या नजरेला नजर न देणं, अजिबात न हसणं आणि आईनं जवळ घेतलेलं न आवडणं.

ऑटिस्टिक मुलं आपले आईवडील, भाऊबहीण किंवा इतर मुलं यांच्यासोबत आपले नातेसंबंध जोडू शकत नाहीत. त्यांना इतर लोकांमध्येच रस नसतो. जेव्हा ते रडतात, तेव्हा आईवडिल त्यांचं सांत्वन करुन शांत करु शकत नाहीत. काही ऑटिस्टिक मुलांचा
पापा घेतला किंवा त्यांना जवळ घेतलं तर झिडकारुन टाकतात. मात्र काहीजणांना ते आवडतं आणि तसं करायला ते प्रोत्साहन देतात. ऑटिस्टिक व्यक्ती प्रौढ झाल्यानंतरही इतर लोकांचे दृष्टिकोन समजून घेणं त्यांच्यासाठी जवळपास अशक्य असतं.

बहुतेक ऑटिस्टिक लोक संवाद साधायला असमर्थ असतात. ऑटिस्टिक मूल बोलू शकत नसेल तर खुणा किंवा चिन्हं ओळखण्याची किंवा वापरण्याची त्याची क्षमता खूप कमी असते म्हणजे जवळपास नसतेच. तो दुसर्‍यांचं बोलणं समजू शकत नाही. ऑटिस्टिक व्यक्ती बोलताना सर्वनाव वापरण्यात गल्लत करते. इतरांकडून ऐकलेलं वाक्यच ते परत बोलतात. उदाहरणार्थ, एक ऑटिस्टिक मुलगा ज्या कोणाला भेटेल त्याला विचारायचा ‘तुम्ही ग्रीटिंग कार्डस बनवणार्‍या पाच कंपन्यांची नावं सांगू शकाल का?’

ऑटिस्टिक मुलं इतर मुलांबरोबर खेळत नाहीत आणि खेळायचा अविर्भावही आणत नाहीत. खेळातली मोटारगाडी चालवण्याऐवजी त्या एकामागून एक लावणं असे प्रकार ते करतात. स्वत:भोवती गिरक्या घेणं, इतर वस्तू गोल गोल फिरवणं ते नेहमी करतात. ते एकच का वारंवार करतात, उदाहरणार्थ, वहीतून पानं फाडणं.

ऑटिस्टिक मुलांना आपल्या दिनचर्येत किंवा भोवतालच्या परिस्थितीत झालेला बदल अजिबात खपत नाही. त्यांच्या सगळ्या कामात, दैनंदिनीत नियमितपणा अत्यंत महत्वाचा असतो. उदाहरणार्थ, ऑटिस्टिक मूल जर रेल्वेचं गेट क्रॉस करुन रोज जात असेल, तर रोज रेल्वे पहायचीच असा हट्ट धरुन तो रेल्वे येईपर्यंत गाडी फाटकाबाहेर थांबवण्याचा आग्रह करतो. ड्रायव्हरनं तसं केलं नाही तर तो किंचाळून आपला राग प्रकट करतो.

ऑटिस्टिक मुलं आवाज, दृश्यं, वास या बाबतीत अत्यंत संवेदनाशील असतात. काही मुलं इमारतीच्या आतून आवाज येत असेल तर ते अस्वस्थ होतात. याऊलट काहीजण खूप मोठा आवाज झाला किंवा त्यांना वेदना झाल्या तरी काहीच प्रतिक्रिया देत नाहीत. काहीजण तर स्वत:ला भयानक इजाही करुन घेतात.

ऑटिझमवर ठोस उपाय नसले तरी ऑटिस्टिक व्यक्तीचं आयुष्य सुधारण्यासाठी खूप काही करता येतं. आधुनिक उपचारांमध्ये घर आणि शाळा यांच्या सहकार्यावर जोर दिला जातो. केवळ संस्थेनं त्या मुलावर नियंत्रण ठेवून उपयोग होत नाही. मुलाला संवाद साधायला शिकवताना खुणांचा पण वापर केला जातो. त्यानं योग्य ती कृती करावी यासाठी त्याला कोणत्यातरी बक्षीसाचं उदाहरणार्थ, खाण्याचा आवडता पदार्थ आमिष दाखवलं जातं. त्याचे दैनंदिन व्यवहार सुकर होण्यासाठी आणि त्यानं त्या गोष्टी शिकाव्या यासाठी काटेकोर वेळापत्रक आणि नियमबध्द कृती महत्वाच्या ठरतात.

जी ऑटिस्टिक मुलं वयाच्या पाचव्या वर्षांपर्यंत बोलू शकत नाहीत त्यांना भविष्यात स्वतंत्रपणे जगणं अवघड बनतं. मोठे झाल्यावरही ते आईवडिलांबरोबर राहतात किंवा त्यांच्यासारख्या इतर ऑटिस्टिक लोकांच्या संस्थेत राहू शकतात. जे बोलायला शिकतात, ज्यांचा इंटेलिजन्स कोशंट ७० पेक्षा जास्त असतो त्यांचं आयुष्य जरा आशादायक असतं. पण दुर्दैव म्हणजे एकूण ऑटिस्टिक मुलांपैकी २० टक्के मुलांचाच आयक्यू इतका असतो. यापेक्षा कमी आयक्यू असणार्‍या मुलांना मतिमंद म्हणावं का हे सांगणंही अवघड आहे. त्यांना बोलता येत नाही आणि परीक्षा आवडत नाही या कारणानं ते उत्तरं देऊ शकत नसतील अशीही शक्यता आहे. अर्थात तरीही आयक्यू जास्त असण्याचा परिणाम म्हणजे भविष्यात जरा तरी यश मिळणं खात्रीशीर असतं.

ऑटिस्टिक व्यक्तींचं वय वाढत गेलं तर ते समाजात किंचित मिसळून वागतात. पण किशोरवयात मात्र समाजाशी त्यांचं जमत नाही. सुमारे २५ टक्के ऑटिस्टिक व्यक्तींना फेफरं येतं हेही अजून  एक चिंतेचं कारण आहे. अशावेळी फेफरं येण्याचं प्रमाण कमी करणारं औषध उपयोगी पडू शकतं. ऑटिझम पूर्णपणे केवळ मनोविकार नाही. न्यूरोट्रान्समीटर्स या मेंदूतून स्त्रवणार्‍या रसायनांचं प्रमाण नियंत्रित करणार्‍या औषधांवर सातत्यानं संशोधन चालू असतं. या औषधांचा काही ऑटिस्टिक मुलांवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

कोणत्याही विकाराला, विशेषतः ऑटिझम या विकाराला अनेक कारणं असतात. त्या कारणांबाबत अनेक मतंमतांतरं असू शकतात. पण कोणत्याही पालकांना जर काही खास प्रश्नांची उत्तरं हवी असतील तर या पुस्तकाच्या अखेरीस दिलेल्या ऑटिझममधल्या तज्ञांच्या यादीतून निवडून पालकांनी त्यांना संपर्क करावा.

या पुस्तकांमधल्या चित्रांबद्दल बोलायचं झालं तर ही आमच्या कुटुंबातली रोज दिसणारी चित्रं आहेत. फक्त शेवटच्या पानावरचा फोटो या पुस्तकासाठी खास काढला होता. आम्ही रसेलला या चित्रात तो जसा आहे तसा दिसण्यासाठी मनवलं, जे करणं त्याच्यासाठी खूप अवघड होतं. आम्ही त्याला बक्षीस म्हणून मिठाई दिली (याला लाच म्हणणं जास्त योग्य ठरेल) आणि मी पटकन फोटो काढला.


मुलांना हे पुस्तक आवडेल अशी मला आशा वाटते. जगातले रसेल आपल्यासारखेच कसे आहेत किंवा आपल्यापेक्षा कसे वेगळे आहेत अशा विषयांवर जर हे पुस्तक वाचून चर्चा झाली तर फारच छान. पुस्तक वाचणारे नंतर ऑटिझमवर काम करणारे प्रशिक्षक होतील किंवा त्यावर संशोधनही करतील. कोणी सांगावं?



रसेल एक विशेष मुलगा आहे. तो ऑटिस्टिक आहे. याचा अर्थ तो इतर मुलांपेक्षा तीन प्रकारे वेगळा आहे. पहिलं म्हणजे, तो जितकं जमेल तितकं एकटं रहाणं पसंत करतो. त्याला लोकांमध्ये काही रस नाहीये. दुसरं म्हणजे तो बोलू शकत नाही आणि इतरजण काय म्हणतायत ते त्याला खूप मुश्किलीनं समजतं. तिसरं म्हणजे, तो इतर मुलांपेक्षा वेगळ्या पध्दतीनं खेळतो.

रसेल ९ वर्षांचा आहे. त्याला दोन छोटे भाऊ आहेत – बेंजामिन आणि ग्रेगोरी. त्या दोघांचंही आपल्या रसेल या भावावर खूप प्रेम आहे. तो ऑटिस्टिक असल्याचं त्यांना ठाऊक आहे. यामुळे त्याला मदत करायचा ते पुरेपूर प्रयत्न करतात. त्याच्याशी मैत्री जमवण्याचा प्रयत्न रकतात. सगळ्या भावंडांप्रमाणे ते तिघ खूप मस्ती करतात. एकत्र आंघोळ करायलाही त्यांना खूप आवडतं.





ग्रेगरी आणि बेंजामिन कधी कधी आपल्या वडिलांना रसेल का बरं ऑटिस्टिक आहे हा प्रश्न विचारतात. त्यांचे वडील एक डॉक्टर आहेत पण त्यांनाही या प्रश्नाचं उत्तर ठाऊक नाही. काही मुलं ऑटिस्टिक हा होतात हे कुणालाच ठाऊक नाही. अनेकजणांना हा विकार जन्मतःच असतो. लहान असताना जर आई वडिलांनी जवळ घेतलं तर काही ऑटिस्टिक मुलं काहीच प्रतिक्रिया दाखवत नाहीत. त्यांचे हात जणू जखडलेले असतात. आणि जर कोणी त्यांच्याकडे पाहून हसलं तर ते परत हसत नाहीत.



पण रसेल जेव्हा लहान मुलगा होता तेव्हा तोही इतर काही ऑटिस्टिक मुलांसारखं आईवडिलांकडे पाहून हसायचा, त्यांच्या गळ्यात हात टाकायचा. कदाचित त्यामुळेच आजही त्याचं हसू इतकं गोड आहे. त्याला गुदगुल्या करायला आवडतात आणि आईच्या गळ्यात पडायला त्याला आजही आवडतं.

ग्रेगरी आणि बेंजामिन यांना आपल्या मित्रांबरोबर खेळायला आवडतं. पण रसेलला मात्र आवडत नाही. त्याला एकटं रहायला आवडतं. तो कोणी आलं तर खोलीतल्या कोपर्‍यात जातो आणि दुसरी मुलं त्याच्या जवळ गेली तर तो खोली सोडून निघून जातो. सगळ्या ऑटिस्टिक मुलांना मित्र जोडणं अवघड जातं. ते जरा मोठे झाल्यानंतर इतर मुलांबरोबर रहाणं त्यांना तुलनेनं सोपं जातं.



ऑटिस्टिक मुलांना बोलायला शिकण्यातही खूप समस्या येतात. रसेलप्रमाणेच त्यातले बहुतांशीजण अजिबात बोलू शकत नाहीत. काही वेळा पूर्ण वाक्य किंवा काही वाक्यांमधले शब्द, ते पोपटासारखं ऐकून बोलतात. ते म्हणतात, तुला बिस्कीट हवं? खरं तर त्यांना म्हणायचं असतं मला बिस्कीट हवंय. त्यांचा आवाज नेहमीच भावनाशून्य आणि यंत्रासारखा असतो. जणू कम्प्युटर किंवा रोबो बोलतोय असं वाटतं. पण घरात किंवा शाळेत जरा मदत मिळाली तर ते चांगलं बोलायला शिकू शकतात.








रसेलला गुणगुणायला, बडबड करायला, हसायला आणि किंचाळायला सहज जमतं. जेव्हा तो नाराज असतो किंवा जेव्हा जरा उत्तेजित होतो, या दोन्ही अवस्थांमध्ये तो ओरडायला-किंचाळायला लागतो. कधी कधी तो जोरजोरात हसतो आणि नंतर किंचाळतो. रसेलला तेव्हा काय वाटत असेल, त्याची मानसिकता इतकी पटापट का बदलत असेल हे कळणं अवघड आहे.



रसेल चे आईवडील आणि त्याचे शिक्षक त्याला खाणाखुणांची भाषा शिकवायचा प्रयत्न करतात. तो खुणांनी काही शब्द बोलायला शिकला आहे. जसं खाणं, पिणं, मला अजून हवंय इ. रसेल मला अजून हवंय हे सांगताना प्रार्थनेसाठी आपण हात जोडतो तसे जोडून किंवा टाळी वाजवून सांगतो.

ग्रेगरी आणि बेंजामिनला असं खुणांनी बोलणं मजेदार वाटतं. ते दोघं पिणं ही खूण रसेलपेक्षा जास्त चांगल्या पध्दतीनं करतात.





रसेलला मात्र असं खुणांनी बोलणं आवडत नाही. त्याला तहान लागल्यावर तो आपला कप कोणाच्या तरी हातात ठेवतो. त्याला जेव्हा काही पेय प्यायला हवं असतं तेव्हा तो आईचा हात पकडून रेफ्रिजरेटरच्या दारावर ठेवतो. आॅटिस्टिक मुलं नेहमीच अशा प्रकारे अभिनय करुन त्यांना काय हवं असेल ते सांगतात.



रसेलला खायला-प्यायला खूप आवडतं. पण तो ढंगानं खात नाही. त्याला हाताच्या बोटांनी खायला आवडतं. कोणी पहात नसेल तेव्हा तो पिझ्झावरचं टॉपिंग खातो आणि खालचा क्रस्ट सोडून देतो. सँडविचमधलं पीनट बटर हातानं इकडे तिकडे पसरवतो.

रसेलच्या आईवडिलांनी त्याला काटाचमचा वापरुन खायला शिकवलं आहे.



रसेलला ऑटिझम खूप तीव्र असल्यामुळे त्याला कोणतंही काम शिकवणं अवघड आहे. टॉयलेटला जाणं आणि स्वत: स्वत:चे कपडे घालणं हे शिकायला त्याला खूप वेळ लागला. पण सगळ्याच ऑटिस्टिक मुलांना हे शिकायला इतका वेळ लागतोच असं नाही. काहीजण तर खूप पटकन शिकतात. काहीजण तर अद्‌भुत वेगानं शिकतात. ते कागदाशिवाय किंवा कॅल्क्युलेटरशिवाय गुणाकार करतात. काहीजण पियानो सुंदर वाजवतात. मात्र अशी प्रखर बुध्दिमत्ता किंवा सृजनशीलता असलेल्या ऑटिस्टिक मुलांनाही मदतीची गरज असते. त्यांना दोस्ती करायला किंवा रोजगार मिळवायला कोणाचीतरी मदत लागते.



कधी कधी रसेल आपल्या डोळ्यांवर हात ठेवतो, पापण्या खेचायला पहातो आणि अचानक शून्यात पहायला लागतो. त्याच्या डोळ्यांवर प्रखर प्रकाश येत असेल असंही असू शकतं. किंवा त्याला आजूबाजूच्या लोकांकडे पहायचं नसेल असंही शक्य आहे. जेव्हा रसेल दीड वर्षांचा होता तेव्हा आईवडिलांच्या नजरेला नजर भिडवणं किंवा त्यांच्याकडे लक्ष देणं त्यानं सोडून दिलं. त्यांनी रसेलला बोलावलं तरी तो जायचा नाही आणि ते बोलत असताना त्यांच्याकडे पहायचाही नाही. त्यानं आपल्याकडे पहावं यासाठी प्रोत्साहन देताना त्याचे पालक त्याच्या आवडीचा खाद्यपदार्थ त्याला द्यायचे. अशा प्रकारे बक्षीस देऊन ऑटिस्टिक मुलांना शिकवता येतं. हे बक्षीस म्हणून एखाद्या खेळात त्यांना सहभागी करुन घेतलं गेलं तर जास्त उपयोग होतो.





बहुतेक मुलं दुसर्‍यांचं पाहून शिकतात. ते खेळातूनही शिकतात. त्यातून आपली कल्पनाशक्ती लढवतात. बेंजामिन आणि ग्रेगरी आपल्या आईकडून संगीत संचलन कसं करावं ते पाहून तसा अभिनय करत आहेत.



बेंजामिन रसेल की फोटो खेंचने का अभिनय करता है।

ग्रेगरी आपल्या बापाप्रमाणे डॉक्टर असल्याचा अभिनय करतो आहे.



पण रसेलला तो खेळातला कॅमेरा आपल्या तोंडात घालायला आवडतो. रसेल इतर लोकांसारखी नक्कल करु शकत नाही. ऑटिस्टिक मुलं नक्कल करायचे खेळ खेळू शकत नाहीत.



ऑटिस्टिक मुलांची खेळण्याची पध्दत इतर मुलांपेक्षा खूप वेगळी असते. अनेकदा ते एकच काम परत-परत, परत-परत करतात. उदाहरणार्थ, खेळातल्या गाड्यांची रांग लावणं. पण ते त्या गाड्यांमधून आवाज काढत नाहीत. काही ऑटिस्टिक मुलं खेळणी गोल गोल फिरवतात – ते खेळणं खूप आकर्षक असतं असंही नाही. अनेकांना चमकदार गोष्टींशी खेळायला आवडतं, स्टीलचा चमचा किंवा दरवाजाचं हँडल इ.





रसेल जिथे कुठे जातो तिथे आपल्याकडचं एक घड्याळ घेऊन जातो. त्याच्याकडे पहायला त्याला आवडतं. त्यात एक हिरवं द्रव्य वरुन खाली पडत असतं.



तसंच त्याला एक प्लॅस्टिकचा स्ट्रॉ सगळीकडे न्यायला आवडतो. तो स्ट्रॉ मोडून रसेल आपल्या अंगठ्यात दाबून ठेवतो. रसेलला खिडकीच्या बाहेर पहायला आवडतं. कधी कधी तो एखादं खेळणं घेऊन खिडकीच्या काचेवर पटापट मारत बसतो. जर खेळणं नसेल तर हातांनी तसं करतो.

रसेलचे पालक त्याला एका शाळेत पाठवतात. तो शाळेत जातो. त्याला बसमधून जायला खूप आवडतं. रसेलच्या शाळेत त्याच्यासारखीच मुलं आहेत. शाळेत तो साधीसुधी कामं आणि खुणांची भाषा शिकतो. शिक्षक त्याला चांगलं वागायला आणि इतरांशी मैत्री करायला शिकवतात.





त्याच्या शाळेत एक झोपाळा आहे. रसेलला त्याच्यावर झोका घ्यायला खूप आवडतं. खरं तर संगीत ऐकताना सगळ्याच मुलांना आपलं शरीर तालात हलवायला आवडतं. पण ऑटिस्टिक मुलांना हे खासकरुन आवडतं. कधी कधी तर तो त्यांचा सर्वात लाडका खेळ होऊन जातो.

रसेल खूप शांतपणे चालतो. तो पोहायला शिकतो आहे. त्याला पाण्यात डुंबायला खूप आवडतं. अनेक ऑटिस्टिक मुलं अशा शांतपणे कामं करु शकत नाही. काहींची चालण्याची पध्दत जरा बेढब असते.



काही ऑटिस्टिक मुलं खूप संवेदनाशील असतात. त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये किंवा आवडत्या गोष्टींमध्ये बदल झाला तर ते अस्वस्थ होतात. समजा त्यांची लाडकी खुर्ची हलवली तर लगेच त्यांचं लक्ष तिकडे जातं, भले ती खुर्ची किंचित का हलवली असेना.



रसेलला प्रत्येक गोष्ट ठरलेल्या वेळेला करायला आवडते. विशेषत:, रात्रीचं जेवण.



कधी कधी रसेल काहीतरी त्रांगडं करुन ठेवतो. मलम भिंतीवर चोपडतो. टूथपेस्ट खायला लागतो. ग्रेगरी आणि बेंजामिनची खेळणी मोडून टाकतो. मग ते दोघं रागावतात. ग्रेगरी मग त्याला मारल्याचा अभिनय करतो. मग रसेल भिंतीवरचा वॉलपेपर फाडायला सुरुवात करतो.



रात्रीची वेळ रसेलसाठी अवघड असते. काहीवेळा तो झोपेतून उठून ओरडायला लागतो. त्याला काही वेदना होत असतात असंही नाही. कधी कधी तो आधी रडतो, मग एकदम हसायला लागतो. कधी कधी खूप उन्मादात गेल्यानं बिछान्यात शांत बसूच शकत नाही.

बर्‍याच ऑटिस्टिक मुलांना रात्रीच्या वेळी असा त्रास होतो. काहीजण अशावेळी स्वत:ला मारुन घेतात. आपल्याला इजा होईल, दुखेल याची त्यांना चिंता वाटत नाही. जेव्हा रसेल अशी चिडचिड करायला लागतो, तेव्हा तो आपल्या पायाच्या घोट्यावर मारुन घेतो. सुदैवानं ऑटिस्टिक मुलांनी स्वत:ला इजा करुन घेऊ नये याचे मार्ग डॉक्टर आणि शिक्षकांनी शोधून काढले आहेत.



आॅटिस्टिक असून रसेल एक हसतमुख आणि प्रसन्न मुलगा आहे.

आणि तो कधी कधी समस्या उभी करतो पण त्याच्या घरच्या लोकांना त्याच्या अस्तित्वाबद्दल कृतज्ञता वाटते. तो एक खास मुलगा आहे असं त्यांना वाटतं.



**समाप्त**